Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 1.7604(UIF)
Volume-3 | Issue-12 | Jan-2014
Available online at www.isrj.net

# म. गांधीजींचे आर्थिक आणि अर्थव्यवस्थेविषयी विचार

प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड

विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

**प्रस्तावना :**

गांधीजींचा अनेक विषयावरचा प्रगाढ असलेला अभ्यास हा त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातून, मननातून आलेला असल्यामुळे गांधीजींची अनेक विषयावर मांडलेली मते, आजच्या संगणक युगातही तंतोतंत खरी ठरलेली दिसून येतात. विषेशतः गांधीजींना जुन्या मतप्रणालीचे म्हणणारे त्यांचे काही टिकाकार असलेली मंडळी सुद्धा गांधीजींनी मांडलेल्या मतांना काहीवेळा संमतीदर्शक मतेही देऊन जात.

गांधीजींचा यंत्रयुगाला विरोध होता. परंतु यंत्राला नव्हता. यंत्राचा उपयोग मानवी हितासाठी होत असेल तर यंत्रे आवश्यक आहेत. परंतु मानवावर सत्ता मिळविण्यासाठी उपयोगी पडणार असेल तर ते त्याज्य होईल. यंत्रामुळे केंद्रीकरण होते. परावलंबीपणा वाढतो, आर्थिक विषमता वाढते. त्यामुळे व्यक्तीत्व नष्ट होऊ लागते. यंत्रामुळे उत्पादनात वाढ झाली तरी नैतिक विकास होत नाही, यांत्रिक युगामुळे मनुष्य हा यंत्राचा गुलाम होतो. त्याचे जीवनच यांत्रिक बनते. यंत्रामुळे मानवी श्रमाची आवश्यकता कमी वाटू लागते आणि बेकार व अर्धबेकार यांच्या संख्येत भर पडते. मानवाला उपयोग पडणाऱ्या यंत्राबाबत त्यांचा विरोध नव्हता. मानवाला अहितकारक ठरणाऱ्या यंत्राला मात्र त्यांचा विरोध होता. नांगर, तारायंत्रे इ. यंत्रेच असली तरी अशा यंत्रांना गांधीजींचा विरोध नव्हता. मात्र काही थोड्या लोकांबाबत ज्यांच्या हाती यंत्रामुळे संपत्ती आणि आर्थिक सामर्थ्य केंद्रीत करणाऱ्या यंत्राबाबत त्यांचा विशेष विरोध होता. यंत्रांच्या माध्यमातून आर्थिक व अर्थव्यवस्थेबाबतचे त्यांचे विचार प्रकट होत गेलेले दिसून येतात.

## गांधीजींचा मोठ्या उद्योगधंद्यांना विरोध :

गांधीजी अर्थव्यवस्था सुधारावी यासाठी नवनवीन येणाऱ्या बदलांचे स्वागत करणारे चिंतनशील व्यक्तीमत्त्व होते. गरीब किंवा दारिद्यावस्थेतील अकुशल कामगारांना सेवेत सामावून घेतांना यंत्रामुळे अडचणी येत असल्या तरी यंत्रेच अकुशल कारागिरांना प्रशिक्षण देण्याचे कार्य करतात असे गांधीजींना वाटत होते. त्यामुळे यंत्रयुगाला जरी त्यांचा विरोध असला तरी काही चांगल्या गोष्टी ज्या यंत्रामुळे होतात, क्लिष्ट कामे सुकर होतात ते गांधीजींना हवे होते. मोठे उद्योगधंदे आणि ग्रामदेवावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. यंत्राच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादन पक्रिया सुरू झाली म्हणजे आर्थिक, सामजिक, राजकीय प्रश्न निर्माण होतात आणि शिवाय नैतिक अधःपात होतो म्हणून मोठ्या उद्योगधंद्याच्या स्थापनेला आणि विकासाला त्यांचा विरोध होता.

## लघु उ़द्योगधंद्यांना उत्तेजन :

आर्थिक बाबतीत असलेली गांधीजींची मते परखड होती. मोठ्या उद्योगधंद्यांना विरोध दर्शवून लघुउद्योगांला प्राधान्य देऊन अर्थव्यवस्थेसंबंधी देखील विचारमंथन केलेले दिसून येते. कमी भांडवल लागणाऱ्या छोट्या उद्योगांना उत्तेजन दिले तर परदेशी जाणारा पैसा कमी होऊन भारतातील गरीबी दूर करण्यास त्यामुळे हातभार लागेल. ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने ग्रामोद्योग आणि मुख्यतः खादी, चरखा इत्यादींना महत्त्व दिले पाहिजे. 14 कोटी बेकारांना आणि अर्धपोटी लोकांना अन्न पुरविण्याचा खादी आणि कुटीरोद्योग हाच एकमेव मार्ग आहे. तो आर्थिकदृष्ट्या परवडतो कि नाही हा प्रश्न निर्माण होत नाही. सामान्य अर्थशास्त्र हे स्पर्धेवर उभारलेले आहे. त्यात देशप्रेम, मानवता, भावना यांना कधीही स्थान नाही. याउलट खादीचे अर्थशास्त्र देशप्रेम, भावना आणि मानवता यावर आधारलेले आहे. गिरणी कापडाच्या स्वस्ताईची किंमत आपण अप्रत्यक्षपणे असंख्य गरीब कुटुंबाना धुळीस मिळवून देत असतो. आपले आद्य कर्तव्य आपले गाव व आपल्या गावात निर्माण होणाऱ्या वस्तुंबद्दलचे आहे. आपल्या गावात निर्माण होणाऱ्या वस्तु व कला सौदंर्यांच्या बाबतीत कमी दर्जाच्या आहेत. हा विचारही मनात आणता कामा नये. कारण सर्व श्रेष्ठ कला ही बाह्यरुपात नसून ती अंतर्गत असते.

## परिवर्तनाकरिता हिंसक मार्गाचा त्याग :

आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी वर्गकलह आणि क्रांती हे मार्ग योग्य नव्हेत. वर्गविरहीत लोकशाही निर्माण करावयाची असेल तर

वर्गकलह वाढवून चालणार नाहीत. शांततेच्या मार्गाने सुधारणा घडवून आणली पाहिजे. वर्गकलहाऐवजी प्रत्येक वर्गाने दुसऱ्या वर्गाचे कार्य व त्यांचे महत्त्व समजून घ्यावयास हवे व समन्वय साधण्यावर भर दिला पाहिजे. कोणताही धंदा अगर व्यवसाय कनिष्ठ मानू नये. हिंसक मार्गांनी भांडवलदार व जमीनदार वर्ग नष्ट करून प्रश्न सुटणार नाही. ह्यासाठी सहकार्य आणि समन्वय याच मार्गाने गेले पाहिजे.

त्यासाठी ज्यांच्याजवळ संपत्ती व मालमत्ता आहे त्यांचे सत्याग्रह, आत्मक्लेष, इत्यादी साहाय्याने हृदय परिवर्तन घडवून आणले पाहिजे. आणि अशा व्यक्तींना समाजाच्या संपत्तीचे विश्वस्त मानणे आणि त्यादृष्टीने त्यांचा वागण्यात फरक करण्यास सांगणे योग्य ठरू शकते.

संपत्तीची निर्मिती होण्यासाठी सर्वांचीच मदत लागते. त्यामुळे संपत्ती मालमत्ता इत्यादीवर सर्वांची सत्ता असली पाहिजे. एखाद्या व्यक्तीजवळ जेव्हा योग्य अशा प्रमाणापेक्षा जास्त संपत्ती असेल तेव्हा ती त्या व्यक्तीने समजाचा विश्वस्त म्हणून वापरली पाहिजे.

बदलती परिस्थिती लक्षात घेऊन श्रीमंत व भांडवलदार लोक आपले विचार बदलून चालू काळाला शोभेल असे वर्तन ठेवतील अशी आशा करु या. परंतु तसे झाले नाही तर क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही. असा इशाराही गांधीजींनी दिलेला दिसून येतो.

### असहकाराचा स्वीकार :

वैयक्तीक संपत्तीचा विचार गांधीजींनी नैतिक दृष्टीकोनातून केला होता. खाजगी संपत्तीस त्यांचा विरोध नव्हता. परंतु संपत्तीच्या मालकाने आपल्या गरजा मर्यादित ठेवून असलेल्या संपत्तीचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी केला पाहिजे. असे त्यांना वाटत होते. त्यामुळे आर्थिक समता प्रस्थापित होऊन श्रीमंत व गरीबांमधील अंतर, दरी कमी होण्यास मदत होईल.

श्रीमंतांची संपत्ती जप्त करणे हा अत्याचारी मार्ग ठरेल. भांडवलदार व जमीनदार यांनी विश्वस्त वृत्तीने वागण्याचे नाकारल्यास मजूरांनी आणि कुळांनी त्यांच्याशी असहकार करण्याचे धोरण ठेवावे. समाजाने अगर कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत खाजगी संपत्ती ठेवण्यास हरकत नसावी. भांडवलदारांनी विश्वस्तवृत्ती न स्वीकारल्यास सरकारने उद्योगधंदे आपल्या हाती घेऊन ते लोकहिताच्या दृष्टीने चालवावेत.

### सारांश :

म. गांधीजींच्या मते समाजातील अनेक प्रश्न मुख्यतः आर्थिक प्रश्न आपणच निर्माण करीत असतो. आपल्या गरजा आपण निष्कारण वाढवीत असतो आणि संपत्ती साठविण्याची हाव कमी करीत नाही. ह्यामुळे मानसिक शांतता लाभत नाही आणि संघर्ष कमी होत नाहीत. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या गरजा मर्यादित केल्या पाहिजेत आणि राहणीमान खाली आणले पाहिजे. काही उद्योगधंदे राष्ट्राने चालवावेत. जे समाजहित साधण्यास उपयोग ठरतील. एकूण अर्थव्यवस्था जर नियंत्रणात आणावयाची असेल तर वरील सर्व मार्गांचा अवलंब केला पाहिजे अशी धारणा म. गांधीजींची होती असे म्हणावयास हरकत नाही.

### संदर्भ

1) रामचंद्र महादेव गोखले, आधुनिकभारतीय राजकीय विचारवंत भाग दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे–30, आवृत्ती पहिली, 1979. पृ. 29,30,31
2) भा. ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार.
3) वसंत मून, हरी नरके आणि इतर (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18, भाग 2 (1920 ते 1936), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र – साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र.
4) धारणकर सरल, आधुनिक भारतातील स्त्रीजीवन, य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक (संपादित), 1992.
5) आठल्ये वि. भा., भारताचा इतिहास, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर, 2002.
6) गुप्त शिवकुमार, आधुनिक भारत का सामाजिक तथा आर्थिक इतिहास, पंचशिल प्रकाशन, जयपूर, 2002.
7) डॉ. चौधरी कि. का., जळगाव जिल्हा, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1994.
8) सदानंद मोरे (संपा.), गांधी–विनोबा आणि भारतीय साहित्य, विशेषांक, आमची श्रीवाणी, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे मुखपत्र, धुळे, 1996.



**प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड**
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

